नि.फौ.ख. ३७४/२०२३

नि.क्र. २९

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ फिर्यादी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

.................................................................................................

| | | |
|---|---|---|
| **नांव** | – | **अनिरुध्द नाथा मुळे** |
| **वय** | – | **७५ वर्षे,** |
| **व्यवसाय** | – | **शेती** |
| **रा.** | – | **खळेगाव, ता. गेवराई, जि. बीड** |

.................................................................................................

**सरतपासणी – सरकारी वकील श्रीमती एस.ए. गायकवाड यांचेमार्फत सुरु –**

**१.** दि.१४.०७.२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. मी माझे खळेगाव शिवारातील शेतात होतो. मी शेतात काम करत होतो. त्यावेळी बबन मोहन काळे, जीवन काळे, तीर्थराज काळे, मोहन काळे तिथे आले. त्यांनी बैलगाडीने माझे तुरीचे तास मोडले. म्हणून मी त्यांना तक्रार केली. मी त्यांना मोडू नका असे म्हणालो. ते मला म्हणाले की, शहाणपण शिकवू नकोस आम्ही मोडणारच. त्यांच्यापैकी मोहन काळे याने खाली उतरुन कु–हाडीने माझे डाव्या पायाचे नळगीवर मारले. त्या तीघांच्या हातात काठया होत्या. त्यांनी माझे सर्वांगावर मुक्का मार दिला. त्यानंतर ते पळून गेले. आरोपी क्र.४ ने मला कु–हाडीच्या पात्याकडून मारले.

२. त्यानंतर मी चकलांबा पोलीस ठाण्यात गेलो व त्यांच्यावर तक्रार दाखल केली. मला लिहिता वाचता येत नाही. पोलीसांना मी घडलेली घटना सांगितली. त्यांनी ती लिहून घेतली. त्यावर मी अंगठा केलेला आहे. फिर्याद मला वाचून दाखवली होती. त्यावर समजून माझा अंगठा उमटवला होता. फिर्यादी मध्ये लिहिलेला मजकूर बरोबर होता. सदरच्या फिर्यादीला **नि.३०** देण्यात येते. आरोपी क्र.२ व ३ आज हजर आहेत.

३. मला सदरचा कु–हाड व त्याचा दांडा दोन्ही दाखवल्यास मी ओळखु शकतो. मला सदरची काठी दाखवल्यास मी ओळखु शकतो. मला दाखवलेल्या एकूण

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.01.27 16:52:52 +0530

तीन लाकडी काठया त्याच आहेत. सदर काठयांना **आर्टीकल–अ१, अ२, अ३** देण्यात येते. मला आता दाखवलेली लाकडी दांडा असलेली कु–हाड तीच आहे. सदरच्या कु–हाडीला **आर्टीकल–ब** देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपी क्र.१ ते ४ तर्फे उलट तपास वकील श्री. आरबड यांचे मार्फत –</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, खळेगाव येथील गट नं.८३१ मध्ये आरोपींची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.८३१ मध्ये आरोपीची विहिर आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.८३४, ८३५, ८३६ मध्ये आरोपींचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे जमीनीच्या दक्षिणेला आणि उत्तरेला आरोपींचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे जमीनीच्या दक्षिणेला असलेल्या आरोपींच्या जागेमधून जाणारी पाईपलाईन माझे क्षेत्रामधून पुढे जाते. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरची पाईपलाईन माझे शेतामधून काढून टाकली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि माझे जमीनीमध्ये पूर्व–पश्चिम सामाईक बांध आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो बांध १० ते १२ फुटाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, याच बांधावरुन आरोपी त्यांच्या शेतात जातात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींकडे बैलबारदाना नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ट्रॅक्टरने शेती करतात.

५. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.८३८ मध्ये विहिर होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचा त्या विहिरीमध्ये आठआणे हिस्सा होता. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.८३१ मध्ये असलेल्या विहिरीत आरोपींनी इलेक्ट्रीक मोटर बसवलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, इलेक्ट्रीक मोटर चालण्यासाठी लागत असलेली विजेची वायर माझे शेतामधून गेलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ती विजेची वायर काढून टाकली आहे. हे मला माहिती नाही की, आरोपीने त्या विषयी एमएसईबी कार्यालयात तक्रार दिली होती. हे मला माहिती नाही की, आरोपींनी मी त्यांचा रस्ता अडवला या कारणास्तव तहसिलदार कार्यालयात तक्रारी अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि माझेमध्ये असलेल्या सामाईक बांधावरील दोन लिंबाची झाडे मी तोडलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी त्या विरुध्द वनविभाग कार्यालय

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.01.27 16:52:57 +0530

बीड येथे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे पहिल्यापासूनच माझे मनात आरोपीविषयी राग आहे. ब्रम्हदेव वाळेकर यांना मी ओळखतो. तो माझे पत्नीचा भाचा आहे. दत्ता मुळे हा माझा पुतण्या आहे. घटनेनंतर माझी ब्रम्हदेव वाळेकर आणि दत्ता मुळे यांचेशी भेट झाली होती. मला भेट कधी झाली होती ती तारीख आणि वेळ सांगता येणार नाही.

६. माझे सरतपासातील मजकूर की, त्यांनी बैलगाडीने माझे तुरीचे तास मोडले, हा मी फिर्यादी जबाब देताना सांगितला होता. सदरचा मजकूर माझे फिर्यादीत नमूद नाही, तो का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. पोलीसांनी मला फिर्याद वाचून दाखवली होती. शेतात जाण्यापूर्वी घटनेच्या दिवशी मी घरी होतो. मी साधारण ११.३० च्या सुमारास घरातून निघालो होतो. माझे घर ते शेत ०१कि.मि.चे अंतर आहे. माझे कडे दुचाकी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी दुचाकीवर शेतात गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे जमीनीच्या पूर्वेला कोल्हे यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे जमीनीच्या पश्चिमेला महारनोर यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे जमीनीच्या दक्षिणेला आरोपींची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे जमीनीच्या उत्तरेला आरोपींची आणि कोल्हे यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, हे लोक त्या दिवशी शेतात काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळेस पाऊस सुरु होता. आरोपी आणि माझे मध्ये घटनेपूर्वी काही बोलाचाली झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.८३८ चे क्षेत्रफळ २ गुंठे असून तो विहिरीचा गट आहे.

७. कु–हाडीचा लाकडी दांडा लांबीने साधारण दीड हात होता. त्याचे पाते किती लांब आणि रुंद होते ते मला सांगता येणार नाही. कु–हाड लागल्यानंतर मी बेशुध्द पडलो नव्हतो. कु–हाड लागल्यामुळे माझा पाय फ्रॅक्चर झाला नव्हता. आरोपींनी मला काठीने मारहाण केली तेंव्हा माझे शरीरावर त्याचे व्रण उमटले होते. कु–हाड मारल्यानंतर त्या जागेवरुन रक्त निघाले होते. सदरचे रक्ताने माझे कपडे माखले होते. सदरचे कपडे पोलीसांना मी तपासकामामध्ये जमा केले नव्हते. सदरचे रक्त

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.01.27 16:53:01 +0530

जमीनीवर सांडले होते ते मी पोलीसांना दाखवले होते. भांडणानंतर अर्धा एक तासाने मी पोलीस स्टेशनला गेलो होतो.

८.        फिर्याद दिल्यानंतर दुस–या दिवशी पोलीसांशी माझी भेट झाली होती. पोलीसांशी माझी दुस–या कामानिमित्त भेट झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे शेतातून गेलेली आरोपींची पाईपलाईन मोडली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपी मला नुकसान भरपाई मागत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी दुचाकीवरुन शेतात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरची गाडी घसरल्याने माझा अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, दुचाकीचे शॉक अबजॉरव्हर माझे पायाच्या नळगीला लागल्याने मला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला कु–हाडीने आणि काठीने मारहाण केली नाही. सदरचे कु–हाड आणि काठी ओळखण्यासाठी कोणतीही विशेष खुन नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला जीवे मारण्याची धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.01.27 16:53:06 +0530

**गेवराई.** **(श्रुती ह. पाटील)**

**दि. २७/०१/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गेवराई**

**कोर्ट क्र.२**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 27.01.2026 |
| Transcribed on | :- | 27.01.2026 |
| Checked & Signed on | :- | 27.01.2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer (G-3).